महाराष्ट्र शासन
कार्यालय - सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,प्रशासकिय
इमारत,दुसरा माळा,अकोला
ई मेल-sdswo_akl @rediffmail.com (दूरध्वनी फॅक्स ०७२४-२४२६४३८)

जाक्र.सआ/अकोला/भासशि/आवेदनपत्रे/तपासणी/कार्यक्रम/ 3858 /२०१६-२०१७ अकोला. दि. 22 डिसेंबर २०१६

**महत्वाचे/कालमर्यादा**

प्रति,

प्राचार्य,
...........................................
...........................................
...........................................

विषय :- भारत सरकार शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क मंजूरी प्रस्ताव/ आवेदनपत्रे तपासणी / देयके सादर करणेबाबत
शैक्षणिक सत्र २०१६-२०१७

वरील विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की , सहाय्यक आयुक्त,समाजकल्याण अकोला यांचे कार्यालयाकडे अनुसूचित जाती / विजाभज /विमाप्र /इतर मागास प्रवर्गातील मागासवर्गीय विद्यार्थ्यानां शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी प्रदान योजनेचा लाभ वेळेतच उपलब्ध होणेकरीता शैक्षणिक वर्षे २०१६-२०१७ करीता तालूकास्तरीय कॅम्पचे आयोजन करण्यांत आलेले आहे. सदर कॅम्प मध्ये आवेदनपत्रे तपासणी करुन पात्र लाभार्थ्यानां शिष्यवृत्तीचा लाभ देण्यासाठी शिक्षण शुल्क मंजुरी देणे / आवेदनपत्रे तपासणी व देयके तयार करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने आपल्या महाविद्यालयाचे ऑनलाईन पध्दतीने मागासवर्गीय विद्यार्थ्यानी शिष्यवृत्ती / शिक्षण फी परिक्षा फी बाबतचे आवेदनपत्रे कार्यालयाच्या तपासणी पथकाकडून तपासून घेण्यासाठी नमूद केलेल्या महाविद्यालयामध्ये तपासणी कॅम्पचे वेळी सादर करावयाचे आहे. सदर कॅम्पमध्ये आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्याच्या उक्त योजनेची आवेदनपत्राची तपासणी करुन देयके प्राप्त करुन न घेतल्यास व त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिल्यास त्यास महाविद्यालय प्रमुख म्हणून आपण जबाबदार राहाला यांची कृपया नोंद घ्यावी. ज्या महाविद्यालयाकडून तपासणी कॅम्प मध्ये आवेदनपत्रे सादर केली जाणार नाही. अशा महाविद्यालयाची आवेदनपत्रे जिल्हयातील सर्व महाविद्यालयाचा तपासणी कॅम्प पूर्ण झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या अवधी मध्ये केली जाईल यांचीही कृपया नोंद घ्यावी. तेव्हा संबधित महाविद्यालयांनी तपासणी कॅम्प मध्येच देयके प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

**तपासणी कॅम्पमध्ये शिक्षण शुल्क मंजूरीचे प्रस्तावसोबत खालीलप्रमाणे माहिती सादर करणे अनिवार्य आहे.**

(१) महाविद्यालयाचे शुल्क मंजूरीबाबतचे पत्र ( जावक क्रमांक / दिनांकासह/युडायस क्रमांक) (२) संस्थेस मान्यता मिळाल्याचा संबधित विभागाचा शासन निर्णय (३) शिक्षण विभाग/विद्यापीठ व सक्षम प्राधिकारी यांचे संलग्नता आदेश (सन.२०१६-२०१७ करीता) ( कमवि करीता बोर्ड मान्यता प्रत / संच मान्यता ) (४) अभ्यासकम निहाय मान्य संख्या ( सक्षम प्राधिकारी यांचे आदेशप्रत (५) प्राचार्याच्या आदेशाची प्रत. (६) संबधित प्राचार्याच्या नांवे डिजीटज सिग्नेचर प्राप्त केल्याबाबतची विहित नमुन्यांत माहिती. (७) ई-स्कॉलरशिपचे पोर्टेलवर नोंदविण्यात आलेला महाविद्यालयाचा मास्टर डाटा प्रत (८) भारत सरकार शिष्यवृत्ती बॅक खात्याच्या प्रथम पानाची प्रत (९)सन.२०१६-२०१७ मध्ये ऑनलाईन प्रणालीमध्ये अभ्यासक्रम व वर्षेनिहाय नोंदविण्यांत आलेल्या शुल्काची प्रत. (१०)वरील प्रमाणे नोंदविण्यांत आलेले ज्या सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर केले आहे त्या आदेशाची प्रत. (११)वरील प्रमाणे नोंदविण्यांत आलेले शुल्काबाबतचे पमाणपत्र. (१२) सन.२०१५-२०१६ व त्यापूर्वीचे शिष्यवृत्तीचे आवेदनपत्रे प्रलंबित नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.(१३)मागील तीन वर्षाचे उपयोगिता प्रमाणपत्र जात प्रवर्ग व योजनानिहाय ( अंकेक्षण अहवालाप्रमाणे)(१४)सन.२०१६-२०१७या शैक्षणिक सत्राकरीता भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेकरीता पात्र असणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्याचे आधार कार्ड बॅक खात्याशी संलग्न केल्या बाबत / करण्यात येत असल्या बाबतचे प्रमाणपत्र. (१५)सन.२०१५-२०१६ या शैक्षणिक सत्रातील बॅक खाते क्रमांक / आयएफएससी कोड चुकीचा असल्याने वा अन्य कारणामुळे निर्वाह भत्ता जमा होवू न शकलेल्या विद्यार्थ्याचे खाते क्रमांक सुधारीत करुन देण्यांत आले किंवा कसे ( यादी प्राप्त झाली नसल्यास यादी प्राप्त करुन घ्यावी ).तसेच सन.२०१६-२०१७ करीता उक्त विद्यार्थ्याचे ऑनलाईन प्रणालीमध्ये शिष्यवृत्तीचे नुतनीकरण करतांना खाते क्रमांक दुरुस्त करण्यांत आलेली आहे.याबाबत मी प्रत्यक्ष पडताळणी केली आहे.(असे प्राचार्याचे



7813 31-12-16